श्याम बेनेगल उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून खरं तर , आज मी इथे उभा आहे. घरचाच आणि मराठी माणसाला आपला , जवळचा वाटणारा म्हणून मला बोलावलंय्. तेव्हा याच भूमिकेतून नमस्कार!

मराठी अस्मिता हा शब्द उच्चारला की आपल्याला लगेच त्याचे राजकीय रंग दिसायला लागतात. पण तशा कुठल्याही रंगाशिवाय , चष्म्याशिवाय अस्तित्वात असणाऱ्या मराठी अस्मितेचं वेगळं दर्शन आपल्याला ला अनुभवायला मिळतं सुनील देशमुख आणि महाराष्ट्र फाउंडेशनमुळे! गेली पंचवीस वर्ष महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दडलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती , त्यांनी चोखाळलेल्या अनवट वाटा आणि तरुण पिढीला त्यातून मिळणारी स्फूर्ती , ऊर्जा या सगळ्याचा सातत्याने महाराष्ट्र फाउंडेशनने गौरव केला आहे. अतिशय संयत आणि सकारात्मक पद्धतीने मराठी अस्मितेला झळाळी देण्याचं काम केलं , त्याबद्दल मी सुनील आणि महाराष्ट्र फाऊंडेशनचं मनःपूर्वक अभिनंदन करतो.

फाऊंडेशनचे हे काम , गेली दहा वर्षे साधना ट्रस्ट समर्थपणे पेलत आहे. सामाजिक जाणिवा समृद्ध करण्याचा त्यांनी घेतलेला हा वसा अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांचंही हार्दिक अभिनंदन!

पुरस्कार विजेत्यांपैकी शांता गोखले आणि राजीव नाईक ही दोघं माझ्या प्रिय व्यक्ती! नाट्यजगतातल्या माझ्या वाटचालीत या दोघांचाही सहवास मला लाभला , माझी वाटचाल थोडी जास्त प्रगल्भ व्हायला दोघांचाही हातभार लागला. तसंच हरी नरके , सानिया, प्रवीण बांदेकर यांच्या लेखनाचा मी चाहता आहे. या आपल्या आवडत्या लेखक - कलावंतांचा सत्कार करताना मला खूप आनंद होतोय्.

असे पुरस्कार देताना आणि घेताना एक वेगळी जबाबदारी खांद्यावर येऊन पडते. ती म्हणजे सामाजिक-राजकीय भान राखत , वेगवेगळ्या टप्प्यांवर , वेगवेगळ्या भूमिका घेत , यथार्थ - विवेकवादी मांडणी करत राहायची ; सभोवतालच्या परिस्थितीची दखल घेऊन प्रश्न विचारत रहायचे.

त्या भूमिकेत जाऊन पुढचं हे थोडसं....

“रात्र जशी कधी एका क्षणात येत नाही, तशीच दडपशाही सुद्धा हळू हळू पसरत जाते . दोन्ही घटनांमध्ये सामायिक असतो एक संध्याकाल, जेव्हा सर्वकाही अचल असतं ! आणि त्याच काळी हवेतल्या बदलाची चाहूल घेत आपण जास्तीत जास्त जागरूक असले पाहिजे – नाहीतर एखाद्या बेसावध क्षणी आपण अंधाराचे बळी होऊन जाऊ ."- न्यायमूर्ती विलियम डग्लसनी शतकापूर्वी हे सांगून सुद्धा २०१४ आधीचा संध्याकाल ओळखायला आपण चुकलो होतो. परिणामी आज आपण अंधाराचे बळी झालेलो आहोत . दहशत वादाच्या विळख्यात सापडलेलो आहोतच.

अंधार राज्यात अज्ञानाचं राज्य नसेल तरच नवल ! हजारो वर्षांपूर्वी आपण एका हत्तीचे डोके एका मनुष्याच्या धडाला जोडले याचा अर्थ आपल्याकडे प्लास्टिक सर्जरी हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे; मोर संभोग करत नाहीत तर ते अश्रूंद्वारे प्रजनन करतात, माकडाचे मानवात रूपांतर झाले नाही कारण आपल्या आजी-आजोबांनी अशी गोष्ट सांगितली नाही , $E=mc^2$पेक्षा अधिक चांगले सिद्धांत वेदांमध्ये आहेत असा विश्वास स्टीफन हॉकिंग यांना होता इ. इ.इ. अज्ञानाचा अखंड मारा आपल्यावर चालूच आहे. कसल्याही आधाराविना इतिहासामध्ये बदल करण्यापासून ते अवमानकारक मिथके आणि असत्ये पसरवण्यापर्यंत या बौद्धिक हननाची विविध रूपे सर्वत्र दिसत आहेत. टाटा सामाजिक संस्थेत दलित-ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद झाली, जवाहरलाल नेहरू विद्यापीठा विरुध्द हल्ले सुरू झाले , मराठी शिकविणाऱ्या शाळा बंद होत आहेत , शिक्षण महाग होत य आणि अनेकजण शिक्षणापासून वंचित होत आहेत. थोडक्यात काय तर अंधार गडद करण्यासाठी डोळ्यांवर पट्ट्या बांधल्या जात आहेत. जे त्या पट्ट्या दूर करू बघत होते अशा विचारवंतांच्या हत्या झाल्या आणि त्याचा आजही तपास लागत नाही , लेखकांना निर्भयपणे लिहिता येत नाही , कवींना पोलीस संरक्षण दिले जाते , कार्यकर्त्यांवर नक्षली असल्याचे आरोप ठेऊन त्यांना तुरुंगात टाकले जाते. दहशत राखण्यासाठी अंधाराची गरज असतेच. म्हणूनच अंधार हे राजकीय हत्यार आहे जे पद्धतशीरपणे आपल्यावर सातत्याने चालवलं जात आहे.

डॉ. अमर्त्य सेन यांनी ‘Development as Freedom’ म्हणून सुमारे दोन दशके उलटून गेली. "अभिव्यक्ती स्वातंत्र्या सारखे राजकीय हक्क, आर्थिक गरजांचे सामाजिक भान वाढवण्या साठी केवळ महत्त्वाचे नाहीत तर ते आर्थिक गरजां चे निकष ठरवण्यासाठी आवश्यक असतात. " या मांडणीतले गांभीर्य आपण ओळखले नाही. सेन्सरशिपचा, दहशतीचा नवीन चेहरा आपण वेळेवर ओळखला नाही. निर्भीड पत्रकारिते विरुद्ध १०० कोटींचे दावे लावणे , सामाजिक काम करणार्याळ एनजीओं ची नोंदणी रद्द करून त्यांचे अस्तित्वच संपवायचे , विद्यार्थ्यांवर राष्ट्रद्रोहाचे खटले भरले जाणे, स्वतंत्र माध्यमांच्या मालकांवर आर्थिक दंडात्मक कारवाई करणे, ही सगळी अंधारनितीची हत्यारे आहेत. दोन अमेरिकन प्राध्यापकांनी “SLAPP” म्हणजे Strategic Lawsuits Against Public Participation अशी phraseही त्यासाठी रूढ केली आहे. व्यक्ति आणि समूहाच्या विचारांना प्रतिबंधित करत जनमत नियंत्रित केलं नाही तर अंधार पसरणार कसा?

राजकीय आणि सांस्कृतिक दहशतीचा हा नवा अवतार आहे. रोजच्या जीवनातली उदाहरणे घेऊन राष्ट्रवादाचे , धर्माष्ठाधित राष्ट्रानिर्मितीचे वेगवेगळे पैलू किंवा प्रतीके सार्वत्रिक करणे , उदाहरणार्थ राष्ट्रगीत, झेंडे, गोमाता, सणांचे स्तोम, भव्य पुतळे, जाहिराती आणि फलक – this is normalization of cultural violence. ती हिंसा उघड होऊ नाही म्हणून परिस्थितीला धूसर ठेवायचे, माध्यमांना हाताशी धरायचे... याविरुध्द्ध जरा ब्र काढला तर तुम्ही अर्बन नक्षल ठरवले जाता. तुमच्यावर अदृश्य फौजांचे हल्ले सुरू होतात.

२०१७च्या ‘Reporters without borders’ च्या अहवालात ‘देशामध्ये लोकांना किती स्वातंत्र्य आहे’ या निकषावर भारताला १३६व्या क्रमांकावर ठेवले गेले.

हे दारुण आहे.

मुद्दा असा आहे, पुढे काय ?

पुढे २०१९च्या निवडणुका आहेत ; निवडणुकीत मतदान करणे आपल्या हातात आहे ; तेव्हा कोणाला मतदान करणे आणि ती निवड करताना डोळे उघडे ठेवणे आपल्या हातात आहे ; खोट्या प्रचारामागच्या अंतस्थ हेतूनना समजून घेणं आपल्या हातात आहे ; अंधारनीतीचा भेद करणे आपल्या हातात आहे ; त्यासाठी एकत्र येणं आपल्या हातात आहे . त्याचेच पहिले पाऊल म्हणून २९ जानेवारीला मुंबईत पुरोगामी विचारांचे , सवेदनशील कलाकार, साहित्यिक, रसिक वाचक एकत्र येणार आहेत. या सारखी छोटी छोटी पावले आपआपल्या क्षेत्रात , परिसरात उचलण्यासाठी सगळे समविचारी एकत्र येणे गरजेचे आहे.

निर्भय बनून एकत्र येऊ या... एकत्र येऊन अंधारनीतीचा भेद करू या !